आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची जमैकाच्या प्रधानमंत्र्यांबरोबर उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर चर्चा

- जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि अखेरच्या टप्प्यातल्या मतदानाला प्रारंभ / ११ वाजेपर्यंत

- चीनसोबत प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरली परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत भारत कोणत्याही आव्हानाला सामोरं जायला तयार असल्याचं लष्करप्रमुखांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री अमित शाह मुंबईच्या दौऱ्यावर

**आणि**

- आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पोर्ट फेडरेशन ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये भारताला ५ सुवर्णपदकांची कमाई

**<><><><><>**

प्रधान नरेंद्र मोदी  आणि जमैकाचे प्रधानमंत्री डॉ अँड्र्यू हॉलनेस यांच्यात आज नवी दिल्ली इथल्या हैदराबाद हाऊसवर अंतराळ, क्रीडा, जागतिक शांतता,  चित्रपट निर्मिती आदी विषयांवर द्विपक्षीय चर्चा झाली. दोनही प्रधानमंत्र्यांनी चर्चेनंतर संयुक्त निवेदनात या बाबतीत माहिती दिली. कोविड विरोधी लसींच्या मदतीसाठी हॉलनेस यांनी भारताचे आभार मानले.  द्विपक्षीय

संबंध बळकट करण्यासाठी, दोन्ही देशांदरम्यान अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. जमैकाचे प्रधानमंत्री आपल्या चार दिवसांच्या भारत भेटीवर आले आहेत. आपल्या दौऱ्यात ते राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींचीही भेट घेणार आहेत. दौऱ्यात इतर मान्यवरांचीही भेट घेतील आणि व्यापार आणि उद्योग क्षेत्रातील नेत्यांशी संवाद साधतील. उद्या ते वाराणसीलाही भेट देणार आहेत. भारत आणि जमैकामधील द्विपक्षीय व्यापार ६ कोटी ६० लाख अमेरिकी डॉलर्सच्या पुढे गेला असून, भारताच्या निर्यातीत सातत्याने वाढ होत आहे, असंही हॉलसन यांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये जाहीर केलेल्या १० लाख अमेरिकन डॉलर्सच्या अनुदानाच्या आधारे जमैकामधील किटसन टाउनमध्ये ग्रामीण विकास प्रकल्प राबवला जात आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इस्राईलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यान्याहू यांच्याशी पश्चिम आशियातल्या घडामोडींविषयी काल चर्चा केली. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर लिहीलेल्या संदेशात म्हटलं आहे, की पश्चिम आशियातला तणाव निवळणं आवश्यक आहे; ओलिसांची सुरक्षित सुटका करणंही महत्त्वाचं असून, या क्षेत्रात लवकरात लवकर शांतता आणि स्थिरता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना भारताचा कायमच पाठिंबा राहील असंही प्रधानमंत्री मोदी यांनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकांच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या मतदानाला आज सकाळी सुरुवात झाली. सकाळी ११ वाजेपर्यंत २८ पूर्णांक १२ शतांश टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे. मतदान प्रक्रिया शांततेत, सुरळीतपणे पार पडावी यासाठी राज्यातील सात जिल्ह्यातील ४० मतदार संघात अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. संध्याकाळी ६ पर्यंत मतदानाची वेळ आहे. एकूण ५ हजार ६० मतदान केंद्र उभारण्यात आली असून ती प्राथमिक सोयीसुविधांनी सुसज्ज आहेत. २० हजारांहून अधिक निवडणूक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

या टप्प्यात ३९ लाखाहूंन अधिक मतदार ४१५ उमेदवारांचं भविष्य ठरवणार आहेत. जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी १८सप्टेंबरला पहिल्या तर आणि २५ सप्टेंबर पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मतदान झालं. पहिल्या टप्प्यात ६१टक्के आणि दुसऱ्या टप्प्यात ५७ टक्के मतदानाची नोंद झाली. या सर्व टप्प्यांची मतमोजणी ८ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जम्मू काश्मीरमधल्या मतदारांनी आपला हक्क आवर्जून बजावावा, असं आवाहन केलं आहे. जम्मू काश्मीरमधे युवा आणि महिला मतदार मोठ्या प्रमाणावर मतदान करतील, अशी आशा त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्ट मधे व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

चीनसोबत एलएसी अर्थात प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरली परिस्थिती स्थिर असली तरी सामान्य झालेली नाही असं लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत चाणक्य डिफेन्स डायलॉग या कार्यक्रमात ते आज बोलत होते. एप्रिल २०२० पूर्वी होती तशी स्थिती पूर्ववत करणं हे भारताचं उद्दिष्ट असल्याचं द्विवेदी यांनी सांगितलं. ही परिस्थिती जोपर्यंत पूर्ववत होत नाही तोपर्यंत भारत कोणत्याही स्थितीला तोंड द्यायला तयार आहे, असंही लष्करप्रमुख द्विवेदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बँक कर्जासंबंधीच्या क्षेत्रातली मासिक आकडेवारी भारतीय रिझर्व्ह बँकेने काल जाहीर केली. या आकडेवारीत कृषी आणि संबंधित क्षेत्रातल्या कर्जांमध्ये मागच्या काहीवर्षांच्या तुलनेने यंदाच्या ऑगस्ट महिन्यात १७ पूर्णांक ७ दशांश टक्क्याची वाढ दिसून आली आहे. याच कालावधीत उद्योगांना दिलेल्या कर्जातही १० टक्क्याची वाढ झाली आहे. यात प्रामुख्याने रसायनं आणि रासायनिक उत्पादनं, अन्न प्रक्रिया, पेट्रोलियम आणि पायाभूत सुविधांसाठीच्या कर्जांमध्ये सर्वाधिक वाढ नोंदवली गेली आहे. सेवा क्षेत्राच्या आकडेवारीत मात्र गेल्या वर्षीच्या २१ टक्क्यांच्या तुलनेने यंदा ऑगस्ट महिन्यात १५ पूर्णांक ६ दशांश टक्के इतकी घट दिसून आली. याच कालावधीत वैयक्तिक कर्जातली वाढ १६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवर आली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबईच्या दौऱ्यावर आले आहेत. या दौऱ्यात ते महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे आमदार आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. आज ते मुंबई ठाणे आणि नवीमुंबई इथल्य़ा पदाधिकाऱ्यांशी बोलत आहेत.

**<><><><>**

भारतीय तेल कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात अठ्ठेचाळीस रूपये पन्नास पैसे इतकी वाढ केली आहे. या सिलिंडरची किंमत आता एक हजार सहाशे ब्याण्णव रुपये पन्नास पैसे इतकी झाली आहे. तर पाच किलो एलपीजी सिलिंडरच्या दरातही १२ रुपयांनी वाढ केली आहे. आजपासून हे दर लागू झाले आहेत. दरम्यान, घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**<><><><>**

पश्चिम बंगालमधल्या आर जी कर रुग्णालयातल्या डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी सीबीआयचा तपास संथ गतीने होत असल्याचा आरोप करत W B J D F या डॉक्टरांच्या संघटनेने पुन्हा एकदा कामबंद  आंदोलन सुरू केलं आहे. राज्यातल्या रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरवण्याची मागणीही डॉक्टरांनी केली आहे.

**<><><><>**

'स्वच्छता ही सेवा' अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. रत्नागिरी जिल्ह्यात हे अभियान राबवण्यात आलं. युवा उद्योजक गौरांग आगाशे यांनी याबाबत आकाशवाणीला सांगितलं....

**होल्ड --- बाईट...गौरांग आगाशे**

**<><><><><>**

आयआयटी धनबाद इथं प्रवेश शुल्क भरायला काही मिनिटं उशीर झाला म्हणून प्रवेश नाकारला गेलेल्या दलित विद्यार्थ्याला याच संस्थेत प्रवेश देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या पीठाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर या प्रकरणी काल सुनावणी झाली. याचिकाकर्त्या विद्यार्थ्याला इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग अभ्यासक्रमाला आयआयटी धनबादमध्ये प्रवेश द्यावा, तसंच सर्व सुविधा द्याव्यात, असं न्यायालयाने सांगितलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते रजनीकांत यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे चेन्नईच्या अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. रुग्णालयाकडून रजनीकांत यांच्या प्रकृतीविषयी कोणतीही अधिकृत वैद्यकीय माहिती जाहीर झालेली नाही. तथापि, रजनीकांत यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते गोविंदा यांचा आज पहाटे मुंबई इथल्या निवासस्थानी अपघात झाला. परवाना असलेली रिव्हॉल्वर आपल्या कपाटात ठेवताना गोविंदा यांच्या

हातून निसटली आणि त्यातून गोळीबार झाला. ही गोळी गोविंदा यांच्या पायाला लागल्याने त्यांना एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आलं. डॉक्टरांनी त्यांच्या पायातली गोळी काढली असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पोर्ट फेडरेशन ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या पार्थ राकेश माने याने १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्ण पदक जिंकलं. पेरू इथल्या लिमामध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताच्या अजय मलिक आणि अभिनव शॉ या जोडीनेही १० मीटर एअर रायफल स्पर्धेच्या पुरुषांच्या सांघिक गटात सुवर्णपदक पटकावलं. तर याच स्पर्धेच्या महिलांच्या ज्युनियर गटात गौतमी भानोत, शांभवी क्षीरसागर आणि अनुष्का ठाकूर यांनी १० मीटर एअर रायफलमध्ये सांघिक स्पर्धेत भारताला तिसरं सुवर्ण पदक मिळवून दिलं. या स्पर्धेत सध्या भारत पाच सुवर्णपदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

**<><><><><>**

महिला टी -२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या पूर्वसराव सामन्यांमध्ये बांग्लादेश आणि श्रीलंकेला विजय प्राप्त झाला आहे. बांग्लादेशनं पाकिस्तानला १४० धावांचं लक्ष्य दिलं होतं. या धावसंख्येचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ ११७ धावाच करू शकला. श्रीलंकेनं स्कॉटलंडला ५ गडी राखून पराभूत केलं. स्कॉटलंडनं प्रथम फलंदाजी करताना १९ षटकांत केवळ

५९ धावा केल्या. श्रीलंकेनं ५ गड्यांच्या मोबदल्यात १५ षटकं आणि ३ चेंडूंमध्ये ही धावसंख्या पूर्ण केली.

**<><><><><>**

कानपूर इथं सुरु असलेल्या बांगलादेशाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज पाचव्या दिवशी बांगलादेशाने दुसऱ्या डावात १४६ धावा करून भारतासमोर विजयासाठी ९५ धावांचं आव्हान ठेवलं आहे. कालचा खेळ संपला तेव्हा बांगलादेशाच्या दोन गड्यांच्या मोबदल्यात २६ धावा झाल्या होत्या. त्याआधी भारताने आपला डाव २८५ धावांवर घोषित केला होता. दरम्यान दोन सामन्यांच्या या मालिकेत भारत १-० असा आघाडीवर आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या दोन गड्यांच्या मोबदल्यात ६० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

अन्याय आणि अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी तरुणींना सक्षम बनवण्याच्या दृष्टीनं  हर घर दुर्गा हे अभियान मोलाची भूमिका बजावेल; असा विश्वास लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल मुंबईत व्यक्त केला.

**//<><><><><>//**